**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ०२३.**
**दुरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३ **फॅक्स क्र.** :- २२६४४६३८
**संकेतस्थळ** - www.dol.maharashtra.gov.in **ई-मेल** :- director.dol@ maharashtra.gov.in

जा. क्र.-४/ग्रंथखरेदी सुटदर/२०१८-१९/ १९५४-२००२ दि.२१/०५/२०१८

**वाचा: १.शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२, दि. १७/४/२०१५.**
**२. ग्रंथखरेदीसाठी सुटदर निश्चित करण्याबाबतच्या दि.२१/५/२०१८च्या बैठकीचे इतिवृत्त.**

**आदेश:-**

ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांकडून होणाऱ्या ग्रंथखरेदीच्या सुटदरात एकरुपता रहावी म्हणून संचालनालयाकडून सुटदरपत्रके मागविणारी निविदावजा जाहिरात राज्यातील विविध विभागांतील वृत्तपत्रांतून प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क विभागास देण्यात आली होती. तसेच सदर निविदावजा जाहिरात शासनाच्या व संचालनालयाच्या संकेत स्थळावरही प्रदर्शित करण्यात आलेली होती. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांच्या आधारे सुटदर निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रंथालय संचालनालयामार्फत २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सर्व शासकीय ग्रंथालयांसाठी निश्चित केलेल्या सुटदराप्रमाणे ग्रंथखरेदी करणे बंधनकारक राहील.

राज्यातील ४३ शासकीय ग्रंथालये सर्व प्रकारचे मुद्रीत वाचन साहित्य सन २०१८-१९ या वर्षाकरिता खालील तक्त्यातील सूटदरानुसार कोणत्याही पुरवठादार, प्रकाशक, वितरक, विक्रेता इत्यादीकडून ग्रंथ खरेदी करु शकतील. सुटदरानूसार केलेल्या ग्रंथखरेदीचा अहवाल दरमहा ग्रंथालय संचालनालयास सादर करावा.

**सन २०१८-१९ साठी ग्रंथखरेदी सुटदर**

| अ. क्र. | भाषा / विषय | मराठी | हिंदी | इंग्रजी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | ललित | ३५% | ३०% | ३०% | राज्यातील सर्व ४३ शासकीय ग्रंथालयांकरीता करण्यात येणारी ग्रंथ खरेदी या सुट दराने करण्यात येईल. |
| २) | सर्वसामाजिक शास्त्रे | २५% | २५% | २५% | |
| ३) | नवसाक्षरांचे साहित्य | २५% | २५% | २५% | |
| ४) | बालवाङ:मय/वाङ:मयेतर सर्व विषय | ३०% | २५% | २५% | |
| ५) | शासकीय प्रकाशने | २५% | २५% | २५% | |
| ६) | संदर्भ ग्रंथ | २५% | २५% | २५% | |
| ७) | स्पर्धा परीक्षा | २५% | २५% | २५% | |

**एखाद्या विशिष्ट ग्रंथ वा ग्रंथाच्या बाबतीत या दराने सुट मिळणे शक्य नसेल वा त्यापेक्षा कमी सुटदराने घेण्याबाबतचे विवक्षित प्रकरण संचालकांकडे सादर केल्यास त्यांच्या निर्णयानुसार खरेदीची कार्यवाही करण्यात यावी.**

(कि. गं. धांडोरे )
**ग्रंथालय संचालक**

**प्रति,**
**१) ग्रंथपाल वर्ग-१** राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई
**२) ग्रंथपाल वर्ग-१**, शासकीय विभागीय ग्रंथालय,नागपूर/पुणे
**३) ग्रंथपाल वर्ग-२**, शासकीय विभागीय ग्रंथालय,अमरावती /औरंगाबाद/नाशिक /रत्नागिरी
**४)सहाय्यक ग्रंथालय संचालक**, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, पुणे , मुंबई (कोकण विभाग)
**५) ग्रंथपाल वर्ग-२** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती संदर्भ ग्रंथालय, दापोली
**६) जिल्हा ग्रंथालय अधिकारी,** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,मुंबई शहर/मुंबई उपनगर/ ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/पुणे/कोल्हापूर/सातारा/सांगली/सोलापूर/नाशिक/धुळे/अहमदनगर/नंदूरबार/ जळगाव/औरंगाबाद/जालना/परभणी/लातूर/नांदेड/बीड/उस्मानाबाद/हिंगोली/गोंदिया/गडचिरोली /वाशिम/अमरावती
**७)जिल्हा ग्रंथपाल,** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/नागपूर/भंडारा